आर.सी.सी क्र. ८३२/२०१२
शासन वि. राहुल

निशाणी ६६

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. २</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

माझे नांव — वैशाली रमेश बरब,

वय — ७५ वर्षे, व्यवसाय — काही नाही,

राहणार — जगताप डेअरी, पुणे.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती पी. एस. इंगळे यांच्यामार्फत सुरू</u>**

१. मला साक्षी कामी समन्स मिळाले आहे. मी आरोपीला दाखवल्यास ओळखू शकत नाही. आरोपी आज हजर नाही. घटना १२ वर्षापूर्वी घडली होती. मी घरामधुन दुकानाकडे जात असताना फाईव्ह गार्डनसमोर एका इसमाने मोटारसायकल वरून येवून माझा गळयातील तीन तोळयाचे मंगळसूत्र हिसकावून नेले होते. सदर मंगळसुत्र कोणी काढुन घेतले होते त्या इसमाला मी ओळखु शकत नाही. मी घटनेबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती.

२. आता मला मी पोलीस स्टेशनला दिलेली आरोपी विरुध्दची फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील माझया गळयातील चैन हिसकावुन नेल्याचा मजकुराशिवाय मला इतर मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सही पुरता **नि. ६७** देण्यात येते.

३. आता मला मी पोलीस स्टेशनला दिलेला आरोपी विरुध्दचा छापील प्रथम खबरी अहवाल दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सही पुरता **नि. ६८** देण्यात येते.

**<u>(साक्षीदार अभियोग पक्षाच्या विसंगत कथन करीत असल्याने अभियोग पक्षाने त्यास उलटतपासात विचारु शकणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०/०४/२०१२ रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास मी राहत असलेल्या घराच्या गेटने किराणाच्या दुकानात सामान घ ोवून येत होते त्यावेळी पाठीमागून येणा—या काळया प्लसर वरील पाठीमागे बसणा—या

इसमाने माझया गळयातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून घेतले. त्यावेळी मी ओरडले असता गेटवरील वॉचमॅन तेथे आला. त्यावेळी पाठीमागे बसलेल्या इसमाने सुरा काढुन वॉचमेन लोकांना सु—याने धमकावले त्यामुळे वॉचमेन मागे सरकला.

५. हे मला आठवत नाही की, पोलिसांनी मला आरोपीला तपासादरम्यान दाखवले होते.

६. आता मला माझया पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादी मधील अधोरेखांकित **भाग—अ** मधील मजकुर वाचून दाखविला. सदर मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. सदरचा मजकुर माझया फिर्यादीमध्ये का नमूद करण्यात आला हे सांगू शकत नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, चोरी गेलेले माझे दागिने मला पोलिसांकडून मला त्यावेळी परत मिळालेले आहे. त्यामुळे मला सदरची केस चालवायची नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे सुरु.**

८. आरोपी व आरोपीचे विधिज्ञ पुकारले असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.

**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/—
(शरद ना. गवळी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी

दि.२९/१२/२०२५
पिंपरी